कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) संवर्गातील अधिकाऱ्यांच्या सर्वसाधारण बदल्या.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन आदेश क्रमांकः एलटीएस १२२५/प्र.क्र.१६८(२) /आ (वर्ग-१)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक : ३० मे, २०२५.

शासन आदेश :

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ४ (१), ४ (२) , ४ (३) व कलम ५ मधील तरतुदीनुसार जलसंपदा विभागातील खालील तक्त्यात नमूद कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) संवर्गातील बदलीपात्र अधिकाऱ्यांची प्रशासकीय निकड विचारात घेऊन, नागरी सेवा मंडळाच्या शिफारशीनुसार व सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने बदलीने पदस्थापना स्तंभ क्र.४ येथे दर्शविल्याप्रमाणे करण्यात येत आहेत:

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नाव	सध्या धारण करीत असलेले पद	बदलीने नियुक्तीचे पद
१	२	३	४
१.	श्री.नितीन पांडुरंग खडसे	कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, नंदुरबार.	**कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, अमरावती** या श्री.मोहम्मद अय्युब मो. कुद्दुस यांच्या विनंती बदलीने रिक्त होणाऱ्या पदावर बदलीने पदस्थापना.
२.	श्री.प्रकाश नारायण थोरात	कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, अहिल्यानगर	**सेवानिवृत्तीच्या दिनांकापर्यंत मुदतवाढ**
३.	श्री.आनंद रामदास काळमेघ	कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, सातारा.	**कार्यकारी अभियंता, टेंभू उपसा सिंचन यांत्रिकी व विद्युत पथक ओगलेवाडी, ता.कराड जि.सातारा** या श्री.मारूती महादेव काकड यांच्या विनंती बदलीने रिक्त होणाऱ्या पदावर बदलीने पदस्थापना

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नाव	सध्या धारण करीत असलेले पद	बदलीने नियुक्तीचे पद
४.	श्री.सुभाष मलप्पा बागेवाडी	कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, कोल्हापूर.	**कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, सोलापूर** या श्री.युनुस पेरमपल्ली यांच्या नियतकालीक बदलीने रिक्त होणाऱ्या पदावर बदलीने पदस्थापना.
५.	श्री.जितेंद्र मुकूंदराव पाटील	कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, नाशिक.	**कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, नंदुरबार** या श्री.नितीन खडसे यांच्या नियतकालीक बदलीने रिक्त होणाऱ्या पदावर बदलीने पदस्थापना.
६.	श्री.युनूस इब्राहिम पेरमपल्ली	कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, सोलापूर.	**कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, धाराशिव** या श्री.रईस जहाॅगीर मोमीन यांच्या नियतकालीक बदलीने रिक्त होणाऱ्या पदावर बदलीने पदस्थापना.
७.	श्री.रईस जहाँगीर मोमीन	कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, धाराशिव	**उप अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ, (उ व सं), कोल्हापूर** या श्री.अंकुश जाधव यांच्या नियतकालीक बदलीने रिक्त होणाऱ्या पदावर बदलीने पदस्थापना.
८.	श्री.सुरेश दिगंबर सायरे	सहायक मुख्य अभियंता (यां.), सा.बां.वि. प्रादेशिक विभाग, नागपूर.	**सध्याच्या कार्यरत पदावर १ वर्ष मुदतवाढ.**
९.	श्री.अंकुश काशिनाथराव जाधव	उप अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मडळ, (उ व सं), कोल्हापूर.	**कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, सातारा** या श्री.आनंद काळमेघ यांच्या नियतकालीक बदलीने रिक्त होणाऱ्या पदावर बदलीने पदस्थापना.
१०.	श्री.ज्ञानेश्वर नथू मुठाळ	कार्यकारी अभियंता, प्रमुख द्वार उभारणी पथक क्र.२, नागपूर	**कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, नाशिक** या श्री.जितेंद्र पाटील यांच्या नियतकालीक बदलीने रिक्त होणाऱ्या पदावर बदलीने पदस्थापना.

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नाव	सध्या धारण करीत असलेले पद	बदलीने नियुक्तीचे पद
११.	श्री.राजखॉ इस्माईलखॉ पठाण	उप अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ (उ व सं), नागपूर.	**उप अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ (उ व सं), नांदेड** या श्री.दत्तात्रय सावंत यांच्या विनंती बदलीने रिक्त होणाऱ्या पदावर बदलीने पदस्थापना

२. संबंधित कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) यांनी बदलीने पदस्थापनेच्या ठिकाणी तात्काळ रुजू व्हावे.

३. संबंधीत अधिकाऱ्यास बदलीने पदस्थापनेच्या जागी हजर होण्यासाठी कोणत्या दिनांकास कार्यमुक्त केले आणि ते बदलीच्या जागी कोणत्या दिनांकास हजर झाले याबाबत शासनास **doesttclass1.wrd@maharashtra.gov.in**या ई-मेल संकेतस्थळावर त्वरित कळवावे.

४. सदर आदेशामुळे वरील बदलीने पदस्थापना करण्यात येत असलेल्या पदी संबंधित अधिकारी रुजू झाल्यानंतर, संबंधित पदाचा अतिरिक्त कार्यभार यापूर्वी अन्य अधिकाऱ्याकडे सोपविण्यात आला असल्यास, तो आपोआप संपुष्टात येईल.

५. संबंधीत अधिकाऱ्यास शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणत्याही कारणास्तव रजा मंजूर करु नये. तसेच म.ना.से. (रजा) नियम, १९८१ मधील नियम-३० (सी) नुसार मूळ कार्यालयाने बदली झालेल्या अधिकाऱ्याचे कोणत्याही प्रकारचे रजेचे अर्ज स्विकारु नयेत. असे अर्ज प्राप्त झाल्यास, ते संबंधीत अधिकाऱ्यास मूळ पत्त्यावर नोंदणी पोच देय डाकेने परत करावेत. मूळ कार्यालयाकडे बदली झालेल्या अधिकाऱ्याचे रजेचे अर्ज पाठविल्यास सदर अर्जांची दखल घेण्यात येणार नाही.

६. **सदर बदली आदेशानुसार तात्काळ नियुक्तीच्या ठिकाणी हजर न झाल्यास वा कोणत्याही प्रकारचा दबाव आणून बदली रद्द करण्याचा प्रयत्न झाल्यास, ही कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम २३ चे उल्लंघन करणारी असल्यामुळे, ती गैरवर्तणूक समजून त्यांचे विरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.**

७. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा सांकेतांक क्रमांक २०२५०५३०१९५३०६४०२७ असा आहे. तसेच सदर आदेश जलसंपदा विभागाच्या https://wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरही उपलब्ध करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SUHAS BAJIRAO JADHWAR

Digitally signed by SUHAS BAJIRAO JADHWAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WATER RESOURCES DEPARTMENT, 2.5.4.20=0de66b4d57847be117776aeaf9e53c5b70f1b8d7fdab972d3d1e2c6397e1faa5, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F66717B05E42A313D9839BD11E491F5C5F850C51D1F3CB32930D359D7331FF36, cn=SUHAS BAJIRAO JADHWAR
Date: 2025.05.30 19:53:46 +05'30'

(सुहास जाधवर)
अवर सचिव (सेवा), महाराष्ट्र शासन

प्रत,

१. अपर मुख्य सचिव (जलसंपदा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,मंत्रालय, मुंबई
३. सचिव (लाक्षेवि) / सचिव (प्रकल्प समन्वय), मंत्रालय, मुंबई
४. सर्व कार्यकारी संचालक / महासंचालक, जलसंपदा विभाग.
५. महालेखापाल, महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता), १-मुंबई / २-नागपूर.
६. खाजगी सचिव, मा. मंत्री,जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ), मंत्रालय, मुंबई.
७. खाजगी सचिव, मा. मंत्री,जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण पाटबंधारे विकास महामंडळ), मंत्रालय, मुंबई.
८. सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग
९. मुख्य अभियंता (यांत्रिकी), जलसंपदा विभाग, नाशिक
१०. सर्व अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग
११. सर्व अधीक्षक अभियंता (यांत्रिकी), जलसंपदा विभाग
१२. सर्व संबंधीत अधिकारी
१३. संबंधीत जिल्हा कोषागार अधिकारी.
१४. सर्व कार्यासने, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
१५. कार्यासन आ (वर्ग-१), संग्रहार्थ.